# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **IG2020**

**Total Que. : 100**
**Marks : 200**
**Time : 120 min**

**Mob. No. 9923262977**

**Date :01/12/2019**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020**


**पेपर क्र. (१)**

**विषय : — भूगोल (Geography) [011]**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर क्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**.''

**Head Office : 1st Floor, Vidarbha Hindi Sahitya Sammelan, Jhansi Rani Sq. Sitabuldi, Nagpur-12.**

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spadancareers.org

**१.** बुध ग्रहासंदर्भात खालील विधानांचा विचार करा व योग्य विधानाची निवड करा.
अ. सुर्याला सर्वात जवळचा ब. अतिशय वेगवान क. एकही उपग्रह नाही ड. सर्वात उष्ण
(१) अ आणि ड (२) ब आणि ड (३) अ, ब, क (४) वरील सर्व

---

**२.** जोडया लावा.

| **स्तंभ अ** | **स्तंभ ब** |
|---|---|
| अ. घळई | १. हिमनदी |
| ब. U आकाराची नदी | २. वारा |
| क. भू–छत्रखडक | ३. सागरी लाटा |
| ड. तरंगनिर्मित मंच | ४. वाहते पाणी |

**अ ब क ड**
(१) ४ १ २ ३
(२) ३ ४ १ २
(३) १ २ ४ ३
(४) २ १ ३ ४

---

**३.** खालील विधानांची सत्यता तपासा आणि त्यापैकी कोणते विधान बरोबर आहे ते ओळखा.
अ. पृथ्वीपासून जसजसे उंच जावे तसतसे तापमान कमी होते.
ब. पृथ्वीच्या अंतर्गत भागात जसजसे खोल जावे तसतसे तापमान कमी होते.
क. दर ३२ मी. खोलीवर १ $^{\circ}$C ने सरासरी तापमानात घट होते.
(१) फक्त अ व ब (२) फक्त ब बरोबर (३) फक्त अ बरोबर (४) वरील सर्व

---

**४.** खालील विधानांची सत्यता तपासा आणि त्यापैकी कोणते विधान बरोबर आहे ते ओळखा.
विधान अ : पृथ्वीच्या अक्षिय गतीमुळे दिवस व रात्रीची स्थिती निर्माण होते.
विधान ब : पृथ्वीच्या कक्षिय गतिमुळे दिवस व रात्र यांची असमानता असते.
(१) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत.
(२) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही चूक आहेत.
(३) विधान 'अ' बरोबर असून विधान 'ब' चूक आहे.
(४) विधान 'अ' चूक असून विधान 'ब' बरोबर आहे.

---

**५.** जोडया लावा.

| **स्तंभ अ** | **स्तंभ ब** |
|---|---|
| अ. जागृत ज्वालामुखी | १. उद्रेक होणे बंद झाले परंतू परत होण्याची शक्यता आहे. |
| ब. निद्रीस्त ज्वालामुखी | २. उद्रेक अतिशय स्फोटक असतो. |
| क. मृत ज्वालामुखी | ३. उद्रेक वारंवार होत असतो. |
| ड. पिलीयन ज्वालामुखी | ४. उद्रेक होणे कायमचे थांबले असते. |

**अ ब क ड**
(१) ४ ३ २ १
(२) ३ १ ४ २
(३) १ २ ४ ३
(४) २ १ ३ ४

---

**६.** भुकंपलहरी संदर्भात काही विधाने दिलेली आहेत त्यातील चुकीचे विधान निवडा.
अ. प्राथमिक लहरीचा वेग सर्वात अधिक असतो
ब. भुपृष्ठ लहरीचा वेग सर्वात कमी असतो परंतु सर्वाधिक विध्वंसक असतात
क. दुय्यम लहरी द्रवभागातून प्रवास करतांना वेग मंदावतो.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) फक्त क (४) वरील सर्व

---

**७.** खाली पर्जन्याचे प्रकार व त्यांची वैशिष्टये दिली आहेत त्यातील चुकीचा पर्याय ओळखा.
(१) अभिसरण पर्जन्य – विषुववृत्तीय प्रदेशात अधिक पाऊस
(२) आवर्त पर्जन्य – प्रतिरोध प्रकारचा पाऊस
(३) पर्वतीय पर्जन्य – खंडातर्गत प्रदेशात अधिक पाऊस
(४) मान्सुन वारे – ऋतुनुसार दिशेत बदल करूण वाहणारे वारे

---

www.spandancareers.org

८. खालील विधानांची सत्यता तपासा खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते ओळखा.
विधान अ. पृथ्वी २४ तासामध्ये ३६०° रेखांशास फिरते.
विधान ब. प्रत्येक रेखावृत्त ओलांडण्यास पृथ्वीला चार मिनिटांचा कालावधी लागतो.
(१) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत.
(२) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही चूक आहेत.
(३) विधान 'अ' बरोबर असून विधान 'ब' चूक आहे.
(४) विधान 'अ' चूक असून विधान 'ब' बरोबर आहे.

---

९. जोडया जुळवून योग्य पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| अ. गंगापूर | १. पहिले सिमेंट काँक्रीटचे धरण |
| ब. नागार्जुन सागर | २. सर्वात उंच धरण |
| क. भाक्रानांगल | ३. पहिले मातिचे धरण |
| ड. हिराकुंड | ४. सर्वात लांब धरण |

**अ ब क ड**
(१) १ ३ २ ४
(२) २ ४ ३ १
(३) १ ३ ४ २
(४) ३ १ २ ४

---

१०. खालील विधानांची सत्यता तपासा आणि खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते ओळखा.
विधान अ : महाराष्ट्र पठार हे बेसॉल्ट अग्निजन्य खडकापासून बनलेले असून यावर रेगूर काळी मृदा आढळते.
विधान ब: दखखनच्या पठारावरील बेसॉल्ट खडकांची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकातून झालेल्या लाव्हा रसाच्या संचयनाने झालेली आहे.
(१) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही बरोबर आहेत.
(२) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही चूक आहेत.
(३) विधान 'अ' बरोबर असून विधान 'अ' चूक आहे.
(४) विधान 'अ' चूक असून विधान 'ब' बरोबर आहेत.

---

११. भारतातील सर्वाधिक लांब पल्ल्याची रेल्वे कोणती?
(१) हिमसागर एक्सप्रेस – जम्मूतावी ते कन्याकुमारी
(२) विवेक एक्सप्रेस – दिब्रुगढ ते कन्याकुमारी
(३) जम्मू एक्सप्रेस – तिरूनेल्वेली ते जम्मू
(४) नवयुग एक्सप्रेस – मंगलोर ते जम्मू

---

१२. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणते शहर एकाही राष्ट्रीय महामार्गावर नाही?
(१) चाळीसगाव (२) धुळे (३) संगमनेर (४) औरंगाबाद

---

१३. जोडया जुळवून योग्य पर्याय निवडा.

| **खडक** | **जिल्हे** |
|---|---|
| अ. गोडंवाना | १. यवतमाळ, गडचिरोली |
| ब. धारवाड श्रेणीचे खडक | २. सावंतवाडी, वेंगुर्ला |
| क. आर्कियन श्रेणीचे खडक | ३. भंडारा, गोंदिया |
| ड. विंध्य श्रेणीचे खडक | ४. चंद्रपूर |

**अ ब क ड**
(१) ३ २ ४ १
(२) ४ १ २ ३
(३) १ ३ २ ४
(४) २ १ ३ ४

---

१४. झाडांच्या उंचीनुसार खाली दिलेल्या जंगलांच्या प्रकारांची चढत्या क्रमाने मांडणी करा.
अ. उष्णकटिबंधीय जंगले ब. पाणझडी वने क. सूचिपर्णी जंगले
(१) क, अ, ब (२) ब, क, अ (३) अ, क, ब (४) ब, अ, क

---

**१५.** ‘बिष्णोई’ जमाती बाबत खालीलपैकी योग्य विधान निवडा.

अ. बिष्णोई जमात ही संरक्षक म्हणून ओळखली जाते.

ब. प्राणी आणि वनस्पतीच्या प्राणांचे रक्षण करणे हा ते त्यांचा धर्म मानतात.

क. पंधराव्या शतकापूर्वीपासून हे चालत आले आहे.

ड. त्यांची आध्यात्मीक धर्मगुरू जांभेश्वर गुरू हे पर्यावरण वादी होते.

(१) अ, ब, क (२) ब, क, ड (३) अ, ब, ड (४) वरील सर्व

---

**१६.** खालीलपैकी भारतातील सर्वात मोठा जहाज बांधणी प्रकल्प ओळखा?

(१) गार्डन रिच वर्कशॉप, कोलकाता

(२) हिंदुस्थान शिपयार्ड, विशाखापट्टनम

(३) माझगांव डॉक, मुंबई

(४) कोचीन शिपयार्ड, कोचीन

---

**१७.** नदीकाठावरील शहरे व नदी यांच्या जोडया जुळवा व योग्य पर्याय निवडा.

| **नदी** | **काठावरील शहरे** |
|---|---|
| अ. गीरणा | १. ओझर |
| ब. मांजरा | २. गडहिंगलज |
| क. कुकडी | ३. जळगाव |
| ड. हिरण्यकेशी | ४. लातुर |

**अ ब क ड**

(१) ३ ४ १ २

(२) ३ २ १ ४

(३) ३ १ २ ४

(४) ४ १ ३ २

---

**१८.** खालील विधानांची सत्यता तपासा आणि योग्य विधानांची निवड करा.

अ. राज्यात वन्यजीव सप्ताह दरवर्षी १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान साजरा केला जातो.

ब. जागतिक व्याघ्र दिन २९ जुलै रोजी साजरा केला जातो.

क. राज्यात १ जुलै ते ७ जुलै दरम्यान वनमोहत्सव साजरा केला जातो.

ड. जागतिक वनदिन २२ मार्च रोजी साजरा केला जातो.

(१) फक्त अ व ब (२) फक्त क व ड (३) अ, ब, क (४) वरील सर्व

---

**१९.** वनसंवर्धन क्षेत्र व जिल्हा यांच्या योग्य जोडया लावा.

| **संवर्धन क्षेत्र** | **जिल्हा** |
|---|---|
| अ. बोरगड | १. जळगाव |
| ब. कोलमार्क | २. नंदूरबार |
| क. मुक्ताई भवानी | ३. नाशिक |
| ड. तोरणमाळ | ४. गडचिरोली |

**अ ब क ड**

(१) ३ १ ४ २

(२) २ ३ ४ १

(३) ३ ४ १ २

(४) ४ २ १ ३

---

**२०.** सन २०११ मधील वनांच्या प्रमाणानुसार खालील राज्यांचा उतरता क्रम लावा.

अ. अरूणाचल प्रदेश ब. महाराष्ट्र क. मध्यप्रदेश ड. छत्तीसगड

(१) क, ड, अ, ब (२) अ, क, ड, ब (३) ड, क, ब, अ (४) क, अ, ड, ब

---

**२१.** ध्रुवाकडून विषुववृत्ताकडे वाहणाऱ्या ग्रहीय वाऱ्यांचा योग्य क्रम ओळखा.

(१) ध्रुवीय वारे, व्यापारी वारे, पश्चिमी वारे

(२) व्यापारी वारे, पश्चिमी वारे, ध्रुवीय वारे

(३) व्यापारी वारे, ध्रुवीय वारे, पश्चिमी वारे

(४) ध्रुवीय वारे, पश्चिमी वारे, व्यापारी वारे

---


www.spandancareers.org

२२. खालीलपैकी योग्य जोडया जुळवा.

| **स्तंभ अ** | **स्तंभ ब** |
|---|---|
| अ. भांबर | १. दलदलीचा प्रदेश |
| ब. तराई | २. जाडया भरडया गाळाचे संचयन |
| क. भांगर | ३. नविन गाळाचे संचयन |
| ड. खादर | ४. जुन्या गाळाचे संचयन |

**अ ब क ड**
(१) ४ ३ २ १
(२) २ १ ४ ३
(३) ३ ४ २ १
(४) १ ३ ४ २

२३. नकाशात चिन्हांकीत केलेले खनिज तेल क्षेत्राचा क्रम ओळखा?




(१) नूनमती—माकूमनामदा—दिग्बोई—नहारकटिया
(२) नूनमती—माकूमनामदा—नहारकटिया—दिग्बोई
(३) नहारकटिया—माकूमनामदा—नूनमती—दिग्बोई
(४) माकूमनामदा—दिग्बोई— नूनमती—नहारकटिया


२४. खालील विधाने लक्षात घ्या.
अ. भारतात वनांनी भौगोलिक क्षेत्राच्या २० टक्के भाग व्यापला आहे व त्यापैकी ४० टक्के भाग हा घनदाट वनांचा आहे.
ब. ''राष्ट्रीय वनीकरण कृती कार्यक्रमाअंतर्गत'' भारताच्या क्षेत्रफळाच्या १/३ भाग वनांखाली आणण्याचे उद्दीष्ट आहे.
वरीलपैकी चुकीचे विधान निवडा.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) दोन्ही बरोबर

२५. खालील काही फळे व संशोधन केंद्र दिली आहेत, यावरून योग्य जोडया जुळवा.

| **फळे** | **संशोधन केंद्र** |
|---|---|
| अ. मोसंबी | १. भाट्ये |
| ब. नारळ | २. श्रीरामपूर |
| क. द्राक्षे | ३. श्रीवर्धन |
| ड. सुपारी | ४. उरळी कांच |

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) २ १ ४ ३
(३) ३ २ १ ४
(४) ४ ३ २ १

२६. नकाशात चिन्हांकित करण्यात आलेल्या प्रमुख बंदराचे नावे सांगा?




(१) कोची—नाव्हाशेवा—कांडला—मँगलोर—पणजी
(२) कोची—कांडला—नाव्हाशेवा—मँगलोर—पणजी
(३) नाव्हाशेवा—कोची—कांडला—पणजी—मँगलो
(४) मँगलोर—नाव्हाशेवा—कोची—कांडला—पणजी

www.spandancareers.org

२७. पिकांचे प्रकार व पिके यांच्या योग्य जोडया लावा.

| **पिकांचे प्रकार** | **पिके** |
|---|---|
| अ. तृणधान्य | १. चिंच |
| ब. गळीतधान्य | २. चवळी |
| क. चारा पिके | ३. बाजरी |
| ड. वन पिके | ४. सूर्यफूल |

**अ ब क ड**

(१) ३ १ ४ २
(२) २ ३ ४ १
(३) ३ ४ २ १
(४) ४ २ १ ३

---

२८. ''जांभी मृदे'' संदर्भात खालील विधाने लक्षात घ्या.
अ. उष्णकटीबंधीय जास्त पावसाच्या प्रदेशात आढळते.
ब. कमी सुपीक असते.
क. लोह, ॲल्युमिनिअमचे प्रमाण जास्त असते.
वरीलपैकी योग्य विधान ओळखा.
(१) फक्त अ (२) अ, ब (३) अ, ब, क (४) सर्व पर्याय चुकीचे

---

२९. ब्रम्हपुत्रा नदी संदर्भात चूकीचे विधान ओळखा?
अ. नामचा बरवा येथुन अरूणाचलप्रदेशात प्रवेश करते.
ब. या नदी पात्रात 'माजुली' जगातील सर्वात मोठे नदीय बेट आहे.
क. तिला आसामचे अश्रु असेही म्हणतात.
ड. तसेच आसामची जीवनरेषा असेही म्हणतात.
(१) फक्त अ, ड (२) अ, ब (३) अ, ब, क (४) वरील सर्व बरोबर

---

३०. खालीलपैकी कोणते विधान ''काळी मृदा'' संदर्भात चुकीचे आहे?
अ. ही मृदा कापसासाठी अतिशय उपयुक्त ठरते.
ब. हिचे स्थानिक नाव रेगूर असे आहे.
क. टीटॅनिफेरस मॅग्नाईट मुळे या मृदेस काळा रंग प्राप्त आहे.
ड. ही मृदा बेसाल्ट या खडकापासून तयार झाली आहे.
(१) अ, क (२) क, ड (३) अ, ब, क (४) सर्व बरोबर

---

३१. योग्य जोडया जुळवा.

| **स्तंभ अ** | **स्तंभ ब** |
|---|---|
| अ. माडिया गोंड | १. सहयाद्रीचा पूर्व व पश्चिम उतार |
| ब. भिल्ल | २. मेळघाट डोंगर |
| क. कोरकू | ३. सातपुडा पर्वत |
| ड. काथोडी | ४. सुरजागड डोंगर |

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४
(२) २ १ ४ ३
(३) ३ २ १ ४
(४) ४ ३ २ १

---

३२. विधान (A) : 'सम्पातदिनी' दिवस व रात्रीचा कालावधी सारखा असतो.
विधान (R) : 'सम्पातदिनी' सूर्याची किरणे विषुववृत्तावर लंबरूप पडतात.
(१) विधान (A) व (R) दोन्ही बरोबर असून (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.
(२) विधान (A) व (R) दोन्ही बरोबर असून, (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.
(३) विधान (A) बरोबर व (R) चूक.
(४) विधान (A) चूक व (R) बरोबर.

---

**३३.** खालील विधानांपैकी अयोग्य विधान कोणते?
(१) मलबार हा भाग द्विपकल्पीय भारताच्या पुर्वेस आहे.
(२) कोकण किनारपट्टीचा विस्तार दमणगंगा नदीपासून तेरेखोल नदी पर्यंत आहे.
(३) पश्चिम किनारपट्टीच्या दक्षिणेला लहान मोठे पश्चजल अधिक आहेत.
(४) कोरोमंडल हा भाग द्विपकल्पाच्या पुर्वेस आहे.

---

**३४.** गाळाच्या मृदेसंर्भात खालील विधाने लक्षात घ्या.
अ. देशातील ४०टक्के भाग हा या मृदेने व्यापला आहे.
ब. ही मृदा मैदानी त्रिभुज प्रदेशात आढळते.
क. ही मृदा सुपीक असते.
ड. प्राचीन गाळाच्या मृदेस तराई म्हणतात.
वरीलपैकी अयोग्य विधान निवडा.
(१) अ, ब, क (२) ब, क, ड (३) फक्त ड (४) क, ड

---

**३५.** भारतातील वनासंबंधी खालील विधाने लक्षात घ्या.
अ. खारफुटीच्या वनांचे सर्वाधिक प्रमाण पश्चिम बंगाल व बिहारमध्ये आहे.
ब. भारतात हरियाना राज्य हे सर्वात कमी वनांखाली क्षेत्र असलेले राज्य आहे.
वरीलपैकी चुकीचे विधान ओळखा.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) दोन्ही बरोबर

---

**३६.** भारतीय हवामानासंदर्भात खालील विधाने लक्षात घ्या.
अ. समुद्र सानिध्य लाभलेल्या राज्यात हवामान नेहमी सम असते.
ब. लाहौल (हिमालय प्रदेश) व लडाख येथे मान्सून न पोहचल्यामुळे ते शुष्क राहतात.
क. ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन आवर्त तयार होतात.
वरीलपैकी चुकीची विधाने ओळखा.
(१) अ, ब (२) अ, क (३) ब, क (४) सर्व बरोबर

---

**३७.** खालील विधानाची सत्यता तपासा व योग्य विधानांची निवड करा.
विधान अ : चांगल्या मृदेमध्ये साधारणतः खनिज द्रव्ये, सेंद्रिय द्रव्ये, पाणी व वायू इ. घटक आढळतात.
विधान ब : वरील घटकांचे प्रमाण कमी जास्त झाल्यास मृदेच्या सुपिकतेवर परिणाम होतो.
(१) विधान अ व ब दोन्ही बरोबर आहेत. (२) विधान अ व ब दोन्ही चूक आहेत.
(३) विधान अ बरोबर व ब चूक आहे. (४) विधान अ चूक व ब बरोबर आहे.

---

**३८.** 'अभ्रक' या अधातु खनिजासंदर्भात खालील विधान लक्षात घ्या.
अ. आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताच्या अभ्रकाचा ६०टक्के वाटा आहे.
ब. ब्राझील हा भारताचा त्यासंदर्भात प्रमुख प्रतिस्पर्धक देश आहे.
क. आंध्रप्रदेश, झारखंड हे भारतातील प्रमुख अभ्रक उत्पादक राज्ये आहेत.
वरीलपैकी अयोग्य विधान ओळखा.
(१) अ, ब, क (२) ब, क (३) अ, ब (४) सर्व बरोबर

---

**३९.** भारतातील किनारी मैदानांच्या संदर्भात खालील विधान लक्षात घ्या.
अ. समुद्रकिनारा लाभलेले भारतात नऊ राज्य व चार केंद्रशासित प्रदेश आहेत.
ब. गुजरात व आंध्रप्रदेश यांना सर्वाधिक मोठी किनारपट्टी लाभली आहे.
क. पश्चिम किनारपट्टीच्या गोवा ते मंगलोर पर्यंतच्या भागाला कोकण किनारा म्हणतात.
वरीलपैकी चुकीचे विधान निवडा.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) फक्त क

---

**४०.** खालील विधान लक्षात घ्या.
अ. गंगेच्या सर्व उपनद्या हिमालयात उगम पावतात.
ब. ब्रम्हपुत्रा ही गंगेची सर्वात मोठी उपनदी आहे.
क. गंगा व ब्रम्हपुत्रा वेगवेगळया खोऱ्यातून वाहतात.
वरीलपैकी चुकीचे विधान निवडा.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) फक्त क (४) यापैकी नाही

---

www.spandancareers.org

४१. भारताचे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय अंतर अंशामध्ये जवळपास सारखेच आहे परंतु तेच पुर्व–पश्चिम आणि दक्षिण –उत्तर असे किलोमिटरमध्ये मोजले असता त्यात खूप तफावत जाणवते कारण;
अ. रेखावृत्त या समांतर रेषा असतात.
ब. दोन अक्षवृत्तांमधील अंतर सारखेच असते परंतू रेखावृत्तांमधील अंतर हे विषुवृत्तावर जास्त असते व ते ध्रुवाकडे जाताना कमी होत जाते.
वरीलपैकी कोणते विधान हे योग्य कारण आहे?
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) यापैकी नाही

४२. ''ऑक्टोबर हिट '' ही संज्ञा कशाशी संबंधित आहे?
(१) उन्हाळा ऋतु
(२) कोरडे हवामान
(३) जास्त तापमान व जास्त आर्द्रता यांचा एकत्रित परिणाम
(४) वातावणीय वायुदाब

४३. दख्खनच्या पठरासंदर्भात खालीलपैकी चूकीचे विधान निवडा.
(१) दख्खन पठाराच्या दक्षिणेकडील भागात बिलगीरी टेकडयांजवळ पुर्वघाट व पश्चिम घाट एकत्र येतात.
(२) पठाराच्या उत्तर भागाचा पूर्वेला उतार आहे.
(३) पठारातील नद्या या बारमाही वाहत नसतात.
(४) कोरोमंडल टेकडया या पश्चिम घाटाच्याच भाग आहेत.

४४. जुन–जुलै महिन्यात खालीलपैकी कोणत्या भागातून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे भारतात पश्चिम किनारपट्टीवर जोरदार पर्जन्यवृष्टी होते?
(१) बंगालच्या उपसागराचा दक्षिणेकडील भाग (२) बंगालच्या उपसागराचा उत्तरेकडील भाग
(३) हिंदी महासागर (४) यापैकी नाही

४५. खालील योग्य जोडया जुळवा?

| **प्रदेश** | **मृदा** |
|---|---|
| अ. माळवा पठार | १. गाळाची |
| ब. धारवाड पठार | २. जांभी |
| क. पंजाब मैदान | ३. तांबडी |
| ड. पश्चिम घाट | ४. रेगुर |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (१) | १ | २ | ३ | ४ |
| (२) | ४ | ३ | १ | २ |
| (३) | ३ | ४ | २ | १ |
| (४) | २ | १ | ४ | ३ |

४६. लांबीच्या उतरत्या क्रमानुसार गोदावरी, महानदी, नर्मदा, तापी या नद्यासंदर्भात योग्य असलेला पर्याय निवडा.
(१) गोदावरी–महानदी–नर्मदा–तापी (२) गोदावरी–नर्मदा–महानदी–तापी
(३) नर्मदा–गोदावरी–तापी–महानदी (४) तापी–नर्मदा–गोदावरी–महानदी

४७. उत्तरेकडून दक्षिणेकडे जातांना खालीलपैकी कोणत्या टेकडया अनुक्रमे आढळतात?
(१) नल्लामलाई–निलगिरी–जावडी–अन्नामलाई
(२) नल्लामलाई–जावडी–निलगिरी–अन्नामलाई
(३) अन्नामलाई–जावडी–निलगिरी–नल्लामलाई
(४) अन्नामलाई–निलगिरी–जावडी–नल्लामलाई

४८. खालील विधाने लक्षात घ्या.
अ. पृथ्वी सूर्याभोवती वर्तुळाकार भ्रमन करते.
ब. पृथ्वीचे सूर्यापासूनचे अंतर सतत बदलत असते.
क. ४ जुलैला सूर्य व पृथ्वी यातील अंतर कमी असते तुलनेने ४ जानेवारीला जास्त असते.
वरीलपैकी चूकीचे विधान निवडा?
(१) अ, क (२) फक्त ब (३) फक्त क (४) सर्व बरोबर

www.spandancareers.org

४९. नैसर्गिक प्रदेश व त्यांची वैशिष्टये यांच्या योग्य जोडया जुळवा.

| **नैसर्गिक प्रदेश** | **वैशिष्टये** |
|---|---|
| अ. विषुववृत्तीय प्रदेश | १. अतिउष्णता व अत्यल्प पर्जन्य |
| ब. उष्णवाळवंटी प्रदेश | २. जास्त तापमान व वर्षभर पर्जन्य |
| क. भूमध्य सागरी प्रदेश | ३. ठरावीक ऋतूत पर्जन्य |
| ड. मान्सुन प्रदेश | ४. कोरडे उन्हाळे व हिवाळी पर्जन्य |

**अ ब क ड**
(१) २ ३ १ ४
(२) ४ ३ २ १
(३) १ २ ३ ४
(४) २ १ ४ ३

---

५०. खालील निरिक्षण लक्षात घ्या.
अ. भारतात डिसेंबर महिना चालू आहे.
ब. उत्तर भारतात जास्त वायुभाराचा पट्टा तयार झाला आहे.
वरील परिस्थितीत खालीलपैकी कोणते वारे भारताच्या आसपास वाहतात?
(१) नैऋत्य मोसमी
(२) ईशान्य मोसमी
(३) पश्चिमी व्यत्यय
(४) कालबैसाखी

---

५१. खालील केंद्रशासित प्रदेशाचा क्षेत्रफळानुसार उतरता क्रम लावा.
अंदमान–निकोबार, लक्षद्विप, पाँडेचरी, लद्दाख
(१) अंदमान–निकोबार, लक्षद्विप, पाँडेचरी, लद्दाख
(२) लद्दाख, अंदमान–निकोबार, पाँडेचरी, लक्षद्विप
(३) अंदमान–निकोबार, लद्दाख, पाँडेचरी, लक्षद्विप
(४) लद्दाख, अंदमान–निकोबार, लक्षद्विप, पाँडेचरी

---

५२. भारतीय किनारपट्टीचे आर्थिकदृष्टया महत्वाचे नसणारे विधान निवडा.
(१) पूर्व किनारपट्टीवर मोठया प्रमाणात आवर्त निर्माण होतात.
(२) किनाऱ्याजवळ मोठया प्रमाणात जलवाहतूक चालते.
(३) किनाऱ्याजवळ मोठया प्रमाणात मिठ गोळा करण्याचा व्यवसाय चालतो.
(४) मुंबई, गोवा, कोचीन, मंगलोर, चेन्नई इ. बंदरातून आंतरराष्ट्रीय व्यापार चालतो.

---

५३. योग्य जोडया लावा.

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| अ. दफ्दार | १. भूभागावरील खोल बिंदू |
| ब. किबिथू | २. निकोबार बेट |
| क. इंदिरा पॉईंट | ३. अरूणाचल प्रदेश |
| ड. कुट्टानद | ४. भारताचे उत्तर टोक |

**अ ब क ड**
(१) २ ३ १ ४
(२) ४ २ ३ १
(३) ४ ३ २ १
(४) २ १ ४ ३

---

५४. ''लोकसंख्येच्या घनतेनुसार'' राज्यांचा चढता क्रम ओळखा.
(१) प. बंगाल–बिहार–केरळ–उत्तरप्रदेश–पंजाब
(२) पंजाब–उत्तरप्रदेश–केरळ–प. बंगाल–बिहार
(३) उत्तरप्रदेश–पंजाब–केरळ–प. बंगाल–बिहार
(४) केरळ–पंजाब–प. बंगाल–बिहार–उत्तरप्रदेश

---

www.spandancareers.org

५५. भारताच्या नकाशातील छायांकीत प्रदेश काय दर्शविते.



(१) ऊस पट्टा (२) भात पट्टा (३) गहू पट्टा (४) तेलबिया पट्टा

५६. खालीलपैकी कोणते विधान हे ''लोकसंख्येचा विस्फोट'' या संज्ञेची व्याप्ती अधिक स्पष्ट करते?

(१) जन्मदर जास्त व मृत्युदर कमी (२) जन्मदर व मृत्युदर जास्त
(३) जन्मदर व मृत्युदर कमी (४) जन्मदर कमी व मृत्युदर जास्त

५७. खालीलपैकी योग्य जोडया जुळवा?

| **स्तंभ १** | **स्तंभ २** |
|---|---|
| अ. भाबर | १. कारकोरम पर्वतरांग |
| ब. सियाचीन हिमनदी | २. हिमाचलप्रदेश |
| क. बुंदेलखंड पठार | ३. शिवालीक टेकडयांच्या पायथ्याशी |
| ड. रोहतक खिंड | ४. गंगेचे मैदान व विंध्य पर्वता दरम्यान |

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) ३ १ ४ २
(३) ४ ३ २ १
(४) ३ ४ १ २

५८. खालील विधाने लक्षात घ्या.

अ. भारतात महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरिकण झालेले राज्य आहे.
ब. पश्चिम बंगाल या राज्यात सर्वात जास्त लोकसंख्येची घनता आहे.
वरीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) यापैकी नाही

५९. खालील दिलेल्या पर्यायापैकी चूकीचा पर्याय निवडा?

(१) हिवाळयातील आयन दिन – २२ डिसेंबर
(२) उन्हाळयातील आयन दिन – २१ मार्च
(३) वसंत संम्पात – २२ मार्च
(४) शरद संम्पात – २३ सप्टेंबर

६०. जोडया लावा. जगातील प्रमुख वारे व त्याचे स्थान

| **वारे** | **स्थान** |
|---|---|
| अ. चिनूक | १. अर्जेंटिना |
| ब. खमसीन | २. फ्रान्स |
| क. स्ट्रोल | ३. सौदी अरेबीया |
| ड. पांपेरो | ४. रॉकी पर्वत |

**अ ब क ड**
(१) २ ३ १ ४
(२) ४ ३ २ १
(३) १ २ ३ ४
(४) ३ २ ४ १

**६१.** खालीलपैकी चुकीचे विधान ओळखा?
(१) कर्कवृत्त व मकरवृत्ताच्या पलीकडे सूर्याचे किरणे कधीही लंबरूप पडत नाही.
(२) ध्रुवांकडे सहा महिन्यांचा दिवस असतो.
(३) हिवाळयातील आयन स्थितीत सूर्याची किरणे कर्कवृत्तावर लंबरूप पडतात.
(४) ज्या अक्षरवृत्तावर सूर्यकिरणे लंबरूप पडतात त्याला विषुववृत्त म्हणतात.

---

**६२.** खालील विधाने लक्षात घ्या.
अ. भागीरथी नदी गंगोत्री शिखराजवळ तर अलकनंदा तिबेट व गढवाल सिमेजवळ उगम पावतात.
ब. 'विष्णूप्रयाग' या हिमालयीन परिसरात वरील दोन्ही नद्या एकत्र येतात.
वरीलपैकी चूकीचे विधान ओळखा?
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) दोन्ही बरोबर

---

**६३.** खालीलपैकी चूकीचे विधान ओळखा.
(१) दामोदर नदीचा उगम छोटा नागपूर पठारावर होतो.
(२) तिबेटच्या पठारावर कोशी नदी उगम पावते.
(३) चंबळ व शोण या द्विपकल्पीय नद्या ईशान्यवाहिनी नद्या आहेत.
(४) नर्मदा नदी महाराष्ट्रात उगम पावते.

---

**६४.** रूरकेला येथील स्टिल उद्योगाला;
अ. हिराकूंड धरणातून जलविद्युत मिळते.
ब. ''झारिया'' कोळसा क्षेत्रातून कोळसा उपलब्ध होतो.
क. लोहाचा पुरवठा बाबा बुदान टेकडयातील खाणितून होतो.
वरीलपैकी योग्य विधान ओळखा.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) ब, क (४) यापैकी नाही

---

**६५.** योग्य जोडया जुळवा

| **प्रदेश** | **वने** |
|---|---|
| अ. हिमालय | १. उष्णकटिबंधीय सदाहरीत |
| ब. अमरावती | २. समशितोष्ण अल्पाईण |
| क. सुंदरबन | ३. उष्णकटिबंधीय शुष्क पानझडी |
| ड. पश्चिमघाट | ४. खारफुटी वने |

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) १ ३ ४ २
(३) २ ३ ४ १
(४) ३ २ १ ४

---

**६६.** भारतात कोळश्याच्या साठयासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे?
अ. सुमारे ९० टक्के कोळसाक्षेत्र हे शोन, दामोधर, गोदावरी, महानदी या नद्यांच्या खोऱ्यात आहे.
ब. कमी राख व जास्त उष्मांक हे भारतीय कोळशाने वैशिष्टये आहे.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) यापैकी नाही

---

**६७.** ''पोनम'' या शेतीप्रकाराबाबत खालीलपैकी योग्य विधान निवडा?
अ. पोनम हा शेतीप्रकार मुख्यत्वे केरळमध्ये प्रचलित आहे.
ब. हा स्थलांतरीत शेती प्रकार आहे.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) यापैकी नाही

---

**६८.** भारतातील आधुनिक उद्योगधंद्याच्या विकासामागे खालीलपैकी कोणता घटक मुख्यत्वे कारणीभुत ठरला?
(१) कच्च्या मालाचा पुरवठा
(२) कुशल मनुष्यबळ
(३) भारत सरकारच्या उदारीकरणाचे धोरण
(४) भारतीय मालाला वाढलेली मागणी

---

www.spandancareers.org

**६९.** भारतात प. बंगाल हे तागाच्या उत्पादनात अग्रेसर राज्य आहे कारण?
अ. प. बंगालमध्ये तागाच्या गिरण्या जास्त आहेत.
ब. तागाच्या पिकाला जास्त तापमान व पर्जन्याची गरज असते जी प. बंगालमध्ये पूर्ण होते.
वरीलपैकी योग्य पर्याय निवडा.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) यापैकी नाही

---

**७०.** योग्य जोडया लावा.

| | |
|---|---|
| अ. गोवा | १. गोदावरीचा त्रिभूज प्रदेश |
| ब. लक्षद्विप | २. सर्वात लहान राज्य |
| क. अतिप्राचीन भुभाग | ३. केंद्रशासित प्रदेश |
| ड. पूर्वीय किनारी मैदान | ४. द्विपकल्पीय |

**अ ब क ड**
(१) २ ३ १ ४
(२) ४ ३ २ १
(३) १ २ ३ ४
(४) २ ३ ४ १

---

**७१.** योग्य विधानाची निवड करा.
अ. क्षेत्रफळाच्या बाबतीत भारताचा जगात ६ वा क्रमांक आहे.
ब. भारताला ७ देशाच्या सीमा लागून असून सिक्कीम राज्याला ३ देशाच्या सीमा लागून आहेत.
क. कन्याकुमारीजवळ सर्वात मोठा दिवस व सर्वात लहान दिवस यांच्यातील फरक ४५ मिनिटाचा आहे.
(१) फक्त अ, ब (२) फक्त ब, क (३) फक्त ब (४) वरील सर्व

---

**७२.** योग्य पर्याय ओळखा/निवडा.
अ. काराकोरम – ही ध्रुवीय प्रदेशाबाहेरील सर्वाधिक हिमाच्छादीत असलेली पर्वत रांग होय.
ब. लडाख – समुद्र सपाटीपासून आणि उंचावरील शीत वाळवंट आहे.
क. कैलास – पूर्णपणे भारतीय क्षेत्राबाहेरील पर्वत रांग होय
(१) फक्त अ व ब (२) फक्त ब व क (३) अ व क (४) वरील सर्व

---

**७३.** 'चारमीनार' हे पर्यटनस्थळ खालीलपैकी कोणत्या शहरात आहे?
(१) श्रीनगर (२) हैद्राबाद (३) भूवनेश्वर (४) मदूराई

---

**७४.** योग्य जोडया जुळवा.

| **प्रकल्प** | **राज्य** |
|---|---|
| अ. म. गांधी प्रकल्प | १. कर्नाटक |
| ब. मयुराक्षी प्रकल्प | २. बिहार |
| क. फराक्का | ३. प. बंगाल |
| ड. रिहांद प्रकल्प | ४. उत्तर प्रदेश |

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) १ ३ ४ २
(३) २ ३ ४ १
(४) ३ २ १ ४

---

**७५.** खालील विधानांची सत्यता तपासून योग्य विधानांची निवड करा.
विधान अ : भारतात नैऋत्य मान्सुन वाऱ्याचे आगमन १ जुनला केरळ किनारपट्टीवर होते.
विधान ब : १ जुन ते १५ जुलै पर्यंत संपूर्ण भारतात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो.
(१) विधान अ आणि ब दोन्ही बरोबर आहेत.
(२) विधान अ आणि ब दोन्ही चूक आहेत.
(३) विधान अ बरोबर आणि ब चूक
(४) विधान ब बरोबर आणि अ चूक

---

www.spandancareers.org


**७६.** योग्य जोडया जुळवा.

| **अक्षांश** | **दिनमान** |
| --- | --- |
| अ. ०° | १. १३ तास ५६ मिनिटे |
| ब. ३०° | २. १८ तास ३० मिनिटे |
| क. ५०° | ३. १६ तास १८ मिनिटे |
| ड. ६०° | ४. १२ तास |

**अ ब क ड**

(१) १ २ ३ ४
(२) १ ३ ४ २
(३) ४ १ ३ २
(४) ३ २ १ ४

**७७.** खालील भारताच्या नकाशात अंकानी निर्देशित केलेल्या पर्वतांची अनुक्रम नावे ओळखा?



(१) अरवली–विंध्य–सातपुडा–नल्लामल्ला
(२) विंध्य–अरवली–नल्लामल्ला
(३) अरवली–विंध्य–महादेव–मैकल
(४) अरवली–सातपुडा–महादेव–नल्लामल्ला

**७८.** खालील योग्य जोडया जुळवा.

| **स्तंभ १** | **स्तंभ २** |
| --- | --- |
| अ. कुमाऊ हिमालय | १. सिंधु व सतलज दरम्यान |
| ब. नेपाळ हिमालय | २. काली व तिस्ता दरम्यान |
| क. कश्मिर हिमालय | ३. तिस्ता व ब्रम्हपुत्रा दरम्यान |
| ड. आसाम हिमालय | ४. सतलज व काली दरम्यान |

**अ ब क ड**

(१) ४ २ १ ३
(२) ४ २ ३ १
(३) ३ २ ४ १
(४) २ ३ १ ४

**७९.** खालील कोळश्यांमध्ये असलेल्या कार्बनच्या प्रमाणाच्या चढत्या क्रमानुसार योग्य असलेला पर्याय ओळखा?

(१) पिट, लिग्नाईट, बिट्यूमिनस, ॲन्थ्रासाईट
(२) लिग्नाईट, पिट, बिट्यूमिनस, ॲन्थ्रासाईट
(३) ॲन्थ्रासाईट, लिग्नाईट, बिट्यूमिनस
(४) पिट, ॲन्थ्रासाईट, लिग्नाईट, बिट्यूमिनस

**८०.** खालील पिकांचा मुख्य उत्पादक राज्यासंदर्भात योग्य जोडया जुळवा?

| **पिके** | **राज्य** |
| --- | --- |
| अ. हरभरा | १. मध्यप्रदेश |
| ब. गहू | २. उत्तरप्रदेश |
| क. तंबाखू | ३. गुजरात |
| ड. ज्वारी | ४. महाराष्ट्र |

**अ ब क ड**

(१) ३ ४ १ २
(२) ४ ३ २ १
(३) १ २ ३ ४
(४) २ १ ४ ३

www.spandancareers.org

८१. महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थानाविषयी योग्य विधाने ओळखा?
(१) देशात महाराष्ट्राचा क्षेत्रफळात २ रा क्रमांक लागतो.
(२) महाराष्ट्राचा देशात लोकसंख्येत ३ रा क्रमांक लागतो.
(३) महाराष्ट्राचा आकार त्रिकोणाकृती असून पूर्व सिमावर्ती भागात बंगालचा उपसागर आहे.
(४) महाराष्ट्राचे स्थान कर्कवृत्ताच्या दक्षिणेला असून अरबी सागराच्या पूर्वेला आहे.

---

८२. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील प्रशासकीय विभाग उतरत्या क्रमाने लावा.
(१) पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती
(२) कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद
(३) औरंगाबाद, नाशिक, पुणे, अमरावती
(४) औरंगाबाद, नाशिक, पुणे, नागपूर

---

८३. जोडया लावा.

| **डोंगररांगा/टेकडया** | **जिल्हा** |
|---|---|
| अ. सातमाळा डोंगररांग | १. अहमदनगर |
| ब. गरमसूर टेकडया | २. नाशिक |
| क. गाविलगड टेकडया | ३. नागपूर |
| ड. हरिश्चंद्र डोंगररांगा | ४. अमरावती |

**अ ब क ड**
(१) २ ३ ४ १
(२) ३ ४ १ २
(३) २ १ ४ ३
(४) ४ ३ २ १

---

८४. भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी किती ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात आहेत?
(१) २ (२) ४ (३) ५ (४) १

---

८५. राष्ट्रीय महामार्ग व त्यांचा क्रमांक खाली दिलेला आहे. चुकीची जोडी ओळखा.

| **महामार्ग क्रमांक** | | **राष्ट्रीय महामार्ग** |
|---|---|---|
| (१) NH-4 | — | मुंबई—आग्रा |
| (२) NH-17 | — | मुंबई—पुणे—बेंगलोर |
| (३) NH-211 | — | पुणे—नाशिक रोड |
| (४) NH-50 | — | मुंबई—कोकण—गोवा |

---

८६. महाराष्ट्रातील उद्योगधंद्यासंबंधी पुढे काही विधाने दिली आहेत, त्यापैकी चुकीचे विधान कोणते?
(१) सुती कापड व्यवसाय हा महाराष्ट्रातील सर्वात जूना आहे.
(२) सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयात अन्नप्रक्रिया उद्योग आहेत.
(३) अहमदनगर जिल्हयात चित्रपट निर्मिती व्यवसाय चालतो.
(४) खत निर्मिती कारखाने रायगड, नागपूर, यवतमाळ व अमरावती जिल्हयात आहेत.

---

८७. लोकसंख्या स्थलांतराबाबत अचुक विधान ओळखा.
अ. कमी लोकसंख्या असलेल्या प्रदेशात स्थलांतर घडून आल्यास ते आर्थिक विकासाला पोषक ठरते.
ब. अनियोजीत व अनिर्बद्धपणे स्थलांतर घडून आल्यास प्राथमिक गरजांची पुर्तता निट होत नाही.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही चूक (४) दोन्ही बरोबर

---

८८. खालील योग्य जोडया जुळवा

| **स्तंभ I** | **स्तंभ II** |
|---|---|
| अ. झारीया | १. सोने |
| ब. नवेली | २. लोह खाण |
| क. सिंगभूम | ३. लिग्नाईट |
| ड. कोलार | ४. कोळसा |

**अ ब क ड**
(१) ३ ४ १ २
(२) ४ ३ २ १
(३) २ १ ४ ३
(४) ४ २ १ ३

---

८९. खालील पर्वत शिखरांचा उंचीनुसार योग्य क्रम लावा.
गडलगड्डा, तौला, तोरणा, अस्तंभा, राजगड
(१) तोरणा, राजगड, अस्तंभा, तौला, गडलगड्डा
(२) राजगड, तोरणा, अस्तंभा, गडलगड्डा, तौला
(३) गडलगड्डा, तोरणा, अस्तंभा, तौला, राजगड
(४) तोरणा, राजगड, तौला, अस्तंभा, गडलगड्डा

९०. खालील विधानांची सत्यता तपासून योग्य विधानांची निवड करा.
अ. मेक इन इंडिया सप्ताह १३ ते १८ फेब्रुवारी २०१८ या काळात मुंबई आयोजित करण्यात आला.
ब. या कार्यक्रमाला १०२ देशांनी सहभाग नोंदविला.
क. देश विदेशातून आलेल्या ९ लाख नागरिकांनी या कार्यक्रमास भेट दिली.
ड. या कार्यक्रमा दरम्यान महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्राला बळकटी मिळाली.
(१) अ, ब, क (२) ब, क, ड (३) अ, क, ड (४) वरील सर्व

९१. योग्य जोडया जुळवा.

| **पवन ऊर्जा केंद्र** | **जिल्हा** |
|---|---|
| अ. ठोसेघर | १. धूळे |
| ब. औंधवाडी | २. सांगली |
| क. धाळगाव | ३. नाशिक |
| ड. ब्राम्हणवेल | ४. सातारा |

**अ ब क ड**
(१) ४ ३ २ १
(२) १ २ ३ ४
(३) २ १ ३ ४
(४) ३ ४ १ २

९२. खाली महाराष्ट्रातील सिंचन साधना संदर्भात दिलेल्या विधानावरून योग्य विधानाची निवड करा.
विधान अ : महाराष्ट्रात सर्वाधिक जलसिंचनाचे साधन म्हणून विहीरीचा वापर केला जातो.
विधान ब : पुणे जिल्हयात सर्वाधिक विहिरीची संख्या आहे.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ, ब (४) वरील सर्व चूक

९३. खाली जगातील काही प्रमुख वाळवंटे व संबंधित खंड यांच्या जोडया दिल्या आहेत. त्यावरून चूकीची जोडी निवडा.

| **वाळवंट** | **खंड** |
|---|---|
| (१) कलाहारी | – दक्षिण अफ्रिका |
| (२) थर | – आशिया |
| (३) आटकामा | – उत्तर अमेरिका |
| (४) सहारा | – आफ्रिका |

९४. पूर्वेकडून पश्चिमेकडे जाताना लागणाऱ्या जलविद्युत केंद्राच्या गटाची निवड करा.
(१) भंडारदरा, पेच, जायकवाडी, भातसा
(२) पेच, भातसा, भंडारदरा, जायकवाडी
(३) पेंच, भंडारदरा, भातसा, जायकवाडी
(४) पेंच, जायकवाडी, भंडारदरा, भातसा

९५. जोडया लावा

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| अ. तापमान | १. मिलिमीटर |
| ब. वायुदाब | २. दर ताशी किमी |
| क. पर्जन्य | ३. मिलिबार |
| ड. वाऱ्याचा वेग | ४. सेल्सियस |
| | ५. किलोमीटर |

**अ ब क ड**
(१) ४ ३ १ ५
(२) १ २ ३ ४
(३) २ १ ३ ४
(४) ४ ३ १ २

**९६.** खालीलपैकी कोणत्या खंडातून विषूववृत्त, मकरवृत्त व कर्कवृत्त ही तिनही अक्षवृत्ते जातात?

(१) अफ्रिका (२) आशिया (३) दक्षिण अमेरिका (४) भारतीय उपखंड

**९७.** खालीलपैकी कोणत्या वायुदाब पट्टयाला ''डोलड्रम'' नावाने ओळखले जाते?

(१) विषुववृत्तीय कमी दाब पट्टा (२) समशितोष्ण जास्त दाब पट्टा

(३) उपधृवीय कमी दाब पट्टा (४) धृवीय जास्त दाब पट्टा

**९८.** जोडया लावा.

| **शहर** | **प्रकार** |
|---|---|
| अ. आग्रा | १. प्रशासकीय |
| ब. महू | २. ऐतिहासिक |
| क. चंदीगढ | ३. औद्योगिक |
| ड. नवी दिल्ली | ४. नियोजित |
| | ५. लष्करी |

**अ ब क ड**

(१) ४ ३ २ १

(२) १ २ ३ ४

(३) २ १ ३ ४

(४) ३ ४ १ २

**९९.** खालील विधानांची सत्यता तपासा व योग्य विधानाची निवड करा.

अ. जलमग्न पर्वतीय रांगेचे अति उत्तरेकडील भाग म्हणजे लक्षद्वीप, मालद्विप, आणि छागोस द्विपसमूह होय.

ब. नऊ अक्षांश खाडीच्या दक्षिणेला निकोबार बेट समूह आहे.

क. बॅरेन बेटावर भारतातील एकमेव निद्रीस्त ज्वालामूखी आहे.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) ब व क (४) वरील सर्व

**१००.** खालील ''समशितोष्ण गवताळ जीवसंहती'' व संबंधित प्रदेश यासंदर्भात जोडया जुवळा

| **जीवसंहती** | **प्रदेश** |
|---|---|
| अ. पम्पास् | १. दक्षिण अमेरिका |
| ब. डाउन्स | २. ऑस्ट्रेलिया |
| क. प्रेअरी | ३. उत्तर अमेरिका |
| ड. व्हेल्ड | ४. दक्षिण अफ्रिका |

**अ ब क ड**

(१) ४ २ ३ १

(२) १ ३ ४ २

(३) १ २ ३ ४

(४) ३ २ १ ४

**ALL THE BEST**

www.spandancareers.org

# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020

विषय : – भूगोल (Geography) [011]

ANSWER KEY

Mob. No. 9923262977

Date : 01/12/2019

Total Que. : 100
Marks : 200
Time :2.00hrs

## FINAL ANSWER KEY- GEOGRAPHY [011] – [SET A]

| QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 26 | 1 | 51 | 2 | 76 | 3 |
| 2 | 1 | 27 | 3 | 52 | 1 | 77 | 1 |
| 3 | 3 | 28 | 3 | 53 | 3 | 78 | 1 |
| 4 | 1 | 29 | 4 | 54 | 2 | 79 | 1 |
| 5 | 2 | 30 | 4 | 55 | 3 | 80 | 3 |
| 6 | 3 | 31 | 4 | 56 | 1 | 81 | 4 |
| 7 | 2 | 32 | 1 | 57 | 3 | 82 | 3 |
| 8 | 1 | 33 | 1 | 58 | 1 | 83 | 1 |
| 9 | 4 | 34 | 3 | 59 | 2 | 84 | 3 |
| 10 | 1 | 35 | 1 | 60 | 2 | 85 | 3 |
| 11 | 2 | 36 | 4 | 61 | 3 | 86 | 3 |
| 12 | 4 | 37 | 1 | 62 | 2 | 87 | 4 |
| 13 | 3 | 38 | 4 | 63 | 4 | 88 | 2 |
| 14 | 2 | 39 | 4 | 64 | 3 | 89 | 1 |
| 15 | 4 | 40 | 1 | 65 | 3 | 90 | 2 |
| 16 | 1 | 41 | 2 | 66 | 3 | 91 | 1 |
| 17 | 1 | 42 | 3 | 67 | 3 | 92 | 1 |
| 18 | 3 | 43 | 4 | 68 | 3 | 93 | 3 |
| 19 | 3 | 44 | 3 | 69 | 2 | 94 | 4 |
| 20 | 4 | 45 | 2 | 70 | 4 | 95 | 4 |
| 21 | 4 | 46 | 2 | 71 | 2 | 96 | 1 |
| 22 | 2 | 47 | 2 | 72 | 4 | 97 | 1 |
| 23 | 2 | 48 | 1 | 73 | 2 | 98 | # |
| 24 | 1 | 49 | 4 | 74 | 1 | 99 | 1 |
| 25 | 2 | 50 | 2 | 75 | 1 | 100 | 3 |

www.spandancareers.org

“Save Paper, Save Tiger”